# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि ३१/०१/२०२४

## कार्यवृत्त

आज दि ३१/०१/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, आरोग्य, नियोजन, भांडार, नियोजन, पाणी पुरवठा, संगणक व विद्युत विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | न.प. हद्दीतील क्षेत्रात विविध ठिकाणी रस्त्यातील डांबरी व काँक्रीट खड्डे बुजविण्याबाबत कामाकरीता वार्षिक दरसूची मागविण्याबाबत. |
| २ | मलकापूर नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागमध्ये विविध ठिकाणी कठीण /मऊ मुरूम ८० ते ४० मी.मी. आकाराची,६ मी.मी.आकाराची क्रश खडी याचा पुरवठा व पसरविण्याच्या कामाकरीता वार्षिक दरसूची मागविण्याबाबत. |
| ३ | सन २०२४ - २५ करिता सणासुदी, उत्सव, महापुरुषांच्या जयंती व इतर उत्सवा करिता नगरपालिके मार्फत कराव्या लागणाऱ्या उपाय योजनांकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्याबाबत. |
| ४ | सन २०२४ - २५ करिता न.प. मालमत्तांची दुरुस्ती रंगरंगोटी व इतर आवश्यक कामांकरिता दर पत्रक मागविण्याबाबत. |
| ५ | सन २०२४ - २५ करिता न.प. हद्दीतील महापुरुषांच्या जयंती करिता पुतळ्यांची व परिसरांची रंगरंगोटी करणे बाबतच्या कामाकरिता वार्षिक दर पत्रक मागणीबाबत. |
| ६ | शहरातील विविध ठिकाणी CSR दराने नालीवर ढापे टाकणे करिता सन २०२४-२५ करिता वार्षिक दरपत्रक मागविण्याबाबत. |
| ७ | मलकापूर न. प. हद्दीतील एम. एस. एम. इंग्लिश स्कूल व विज्ञान महाविद्यालय समोर कॉर्नर वरील परिसर सुशोभित करण्याबाबत. |
| | आरोग्य विभाग |
| ८ | सन २०२३-२४ करिता न.प. च्या क्षेपणभूमी वर कचरा विलगीकरण व प्रक्रिया करून प्राप्त खत व इतर साहित्य सामग्रीचे विक्रीकरण बाबत. |
| ९ | आरोग्य विभागासाठी सन २०२४-२५ साठी वार्षिक निविदा करणे बाबत. |
| | नियोजन विभाग |
| १० | मलकापूर न.प. हद्दीतील वन विभागाच्या जागेवर कारवायाच्या बांधकामास परवानगी देणे बाबत. |
| ११ | मलकापूर न.प. हद्दीतील टेलिफोन कॉलनी मधील सर्वे नं. १९०/१ व १९०/१ (अ) ही जागा इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) मलकापूर यांना सामाजिक उपक्रम राबविण्याकरिता देणे |

| | |
|---|---|
| | बाबत. |
| १२ | मलकापूर न.प. हद्दीतील नगरपरिषद शाळा क्र. १ ची शासकीय जागा व इमारत तात्पुरत्या स्वरूपात आर.सी.पी. दंगा काबू पथक ठेवण्याकरिता देण्याबाबत. |
| भांडार विभाग | |
| १३ | मलकापूर न.प. अंतर्गत सन २०२४-२५ साठी सर्व कार्यालयीन साहित्य खरेदी व छपाई कामासाठी वार्षिक निविदा करणे बाबत |
| पाणी पुरवठा विभाग | |
| १४ | नगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागचे कंपाउंड वॉलवर तार फेन्सिंग करणे बाबत. |
| १५ | नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे दक्षिणेकडील दरवाजाला सुरक्षा दरवाजा बसविण्याबाबत |
| १६ | मलकापूर न.प. हद्तील भारतकला रोड ते गेट नं. १३५ कृष्णविहार पाईप लाईन टाकणे बाबत. |
| संगणक विभाग | |
| १७ | आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता संगणक विभाग मार्फत नगर परिषद कार्यालयातील विविध विभागासाठी कॉम्पुटर व प्रिंटर इतर साहित्य खरेदी करणे बाबत वार्षिक निविदा करिता मान्यता देणे बाबत. |
| विद्युत विभाग | |
| १८ | मलकापूर न.प. हद्दीतील पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणे मजुरी सहित व त्यास आवश्यक साहित्य पुरवठा करणे करिता वार्षिक निविदा करणे बाबत. |
| १९ | मलकापूर न.प. मालकीच्या सर्व इमारती व कार्यालयांमध्ये विद्युत यंत्रणा देखभाल दुरुस्ती करणे व त्यास लागणारे साहित्य पुरवठा करणेकरिता वार्षिक निविदा करणे बाबत |
| २० | नगरपरिषद मलकापूर अधिनस्त शहरातील पथदिवे चालू बंद करणे व इतर संबंधित कामे करण्याकरिता मनुष्यबळ पुरवठा करणे करिता वार्षिक निविदा करणे बाबत. |

**विषय क्र १:- न.प. हद्दीतील क्षेत्रात विविध ठिकाणी रस्त्यातील डांबरी व काँक्रीट खड्डे बुजविण्याबाबत कामाकरीता वार्षिक दरसूची मागविण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार शहरात दरवर्षी वेळोवेळी नळ कनेक्शन करिता रस्त्याचे खोदकाम किंवा सततच्या पावसामुळे किंवा इतर कारणांमुळे रस्त्यावर खड्डे पडतात व त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. बऱ्याच वेळा नागरिकांच्या सुद्धा तक्रारी प्राप्त होतात. रहदारी सुरळीत होणाच्या दृष्टीने अथवा धार्मिक उत्सवाच्या अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवावे लागतात. त्यानुसार सदरचे काम काल मर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२४-२५ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्या बाबत नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद काम महत्त्वाचे असल्याकारणाने सदर काम नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र २ :- मलकापूर नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागमध्ये विविध ठिकाणी कठीण /मऊ मुरूम ८० ते ४० मी.मी. आकाराची,६ मी.मी.आकाराची क्रश खडी याचा पुरवठा व पसरविण्याच्या कामाकरीता वार्षिक दरसूची मागविण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार शहरात दरवर्षी वेळोवेळी नळ कनेक्शन करिता रस्त्याचे खोदकाम किंवा सततच्या पावसामुळे किंवा इतर कारणांमुळे रस्त्यावर खड्डे पडतात व त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. बऱ्याच वेळा नागरिकांच्या सुद्धा तक्रारी प्राप्त होतात. रहदारी सुरळीत होणाच्या दृष्टीने अथवा धार्मिक उत्सवाच्या अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवावे लागतात. त्यानुसार सदरचे काम काल मर्यादेत पूर्ण होण्याकरिता सन २०२४-२५ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्या बाबत नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद काम महत्त्वाचे असल्याकारणाने सदर काम नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ३:- सन २०२४ - २५ करिता सणासुदी, उत्सव, महापुरुषांच्या जयंती व इतर उत्सवा करिता नगरपालिके मार्फत कराव्या लागणाऱ्या उपाय योजनांकरिता वार्षिक दरपत्रक मागविण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर शहरात दरवर्षी गणेशोत्सव, दुर्गोत्सव, महापुरुषांच्या जयंती व इतर उत्सव साजरे करण्यात येतात व त्याकरिता नगरपरिषद मार्फत उपाय योजना केल्या जातात. यामध्ये शहरातील साजरे होणारे उत्सवा दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत पोलीस निरीक्षक मलकापूर यांचे कडून पत्र व सूचना प्राप्त होतात. त्यानुसार लाकडी बॅरिगेटिंग करणे तसेच कापडी कनाथ लावणे, सी.सी.टी.व्ही., टॉवर उभारणे व इतर आवश्यक ती कामे कालमर्यादेत पूर्ण होण्याकरता सन २०२३-२४ करिता वार्षिक दरपत्रक मागविण्याबाबत नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे अत्यावश्यक सेवेत येत असून महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ४:- सन २०२४ - २५ करिता न.प. मालमत्तांची दुरुस्ती रंगरंगोटी व इतर आवश्यक कामांकरिता दर पत्रक मागविण्याबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नगरपरिषद हद्दीतील न.प. च्या मालकीच्या मालमत्ता जसे की शाळा, अंगणवाडी, नगरपरिषद इमारती, पाणीपुरवठा आवारातील इमारती व इतर आवश्यक त्या मालमत्तांची दुरुस्ती रंगरंगोटी व इतर आवश्यक ती कामे करून घेणे जरुरीचे असते. त्यानुसार सदरचे काम काल मर्यादित पूर्ण होण्याकरिता सन २०२३-२४ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागवावे लागण्याबाबत नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे अत्यावश्यक सेवेत येत असून महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ५:- सन २०२४ - २५ करिता न.प. हद्दीतील महापुरुषांच्या जयंती करिता पुतळ्यांची व परिसरांची रंगरंगोटी करणे बाबतच्या कामाकरिता वार्षिक दर पत्रक मागणीबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प. हद्दीतील महापुरुषांच्या पुतळ्याची व सभोवतालच्या परिसराची दुरुस्ती, रंगरंगटी व इतर आवश्यक ती कामे महापुरुषांच्या जयंती / पुण्यतिथी अगोदर काल मर्यादेत न.प. मार्फत करून घेणे जरुरीचे असते. त्यानुसार सदरची कामे वेळेत पूर्व होण्याकरण्यात करिता सन २०२४-२५ या वर्षाकरिता वार्षिक दरपत्रक मागवण्याबाबत नमूद केलेले आहे. यामध्ये येणारे शहरातील पुतळे (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (रेल्वे स्टेशन) (२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (भीम नगर) (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (रेल्वे स्टेशन) (४) छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (शिवाजीनगर) (५) छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (बाजीप्रभू नगर) (६) नेताजी सुभाष चंद्र बोस पुतळा (तहसील चौक) (७) संत गाडगेबाबा पुतळा (बुलढाणा रोड) (८) शहीद अब्दुल हमीद चौकातील स्तंभ (९) शहीद संजयसिंह राजपूत यांचे शहीद स्मारक (बुलढाणा रोड) यांचे रंगरंगोटीचे व इतर आवश्यक कामे करण्याबाबत सूचित केलेले आहे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे अत्यावश्यक सेवेत येत असून महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ६:- शहरातील विविध ठिकाणी CSR दराने नालीवर ढापे टाकणे करिता सन २०२४-२५ करिता वार्षिक दरपत्रक मागविण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार शहरात विविध ठिकाणी नाली वरील ढापे तुटलेले असतात किंवा आवश्यकतेनुसार ढापे टाकावे लागतात जेणेकरून रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही अन्यथा अपघात होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. नागरिकांच्या याबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. त्यामुळे नागरिकांच्या सोयींच्या दृष्टीने काल मर्यादेत सदरचे काम पूर्ण होण्याकरिता सन २०२४-२५ या वर्षाकरिता वार्षिक दर पत्रक (CSR) दराने मागवण्याबाबत नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे अत्यावश्यक सेवेत येत असून महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ७:- मलकापूर न. प. हद्दीतील एम. एस. एम. इंग्लिश स्कूल व विज्ञान महाविद्यालय समोर कॉर्नर वरील परिसर सुशोभित करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सेक्रेटरी, गौरीशंकर सेवा समिती मलकापूर यांचे पत्र क्र. GSS/02/24 दिनांक १७/०१/२०२४ नुसार एम.एस.एम. इंग्लिश स्कूल व विज्ञान महाविद्यालय या दोन्ही शैक्षणिक संस्था गौरीशंकर सेवा समितीद्वारे संचलित असून दोन्ही शैक्षणिक संस्थेच्या मध्ये असलेली कॉर्नर वरील बखळ जागा शहराच्या प्रवेशद्वारा जवळ असल्याने त्या जागेचे सुशोभीकरण केल्यास शहराच्या सौंदर्यात वाढ होणार असल्याचे नमूद केलेले आहे. तरी सदर जागेचे सुशोभीकरण

केल्यानंतर त्याची देखभाल करण्याची जबाबदारी गौरीशंकर सेवा समितीचे संचालक मंडळ घेण्यास तयार असल्याचे देखील नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, सदरची जागा ही मलकापूर शहराचे प्रवेशद्वारा जवळील नांदुरा रोडवर असल्याकारणाने व सदर जागेचे सुशोभीकरण केल्यानंतर शहराच्या सौंदर्यात वाढ होणार असल्याने सदर काम करण्याच्या कार्यवाहीस व त्या कामास येणारा खर्च स्वच्छता मोहीम अथवा माझी वसुंधरा अंतर्गत करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र ८:- सन २०२३-२४ करिता न.प. च्या क्षेपणभूमी वर कचरा विलगीकरण व प्रक्रिया करून प्राप्त खत व इतर साहित्य सामग्रीचे विक्रीकरण बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नगरपरिषद मलकापूरच्या क्षेपणभूमीवर जमा होणारा ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खत तयार करण्यात येते. सदर खत हे तपासणीसाठी पाठवण्यात आलेले असून सदर तपासणीचा अहवाल आल्यावर तयार झालेले खत हरित ब्रँड साठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालक यांना सादर करावे लागणार आहे. तसेच सदर हरीत ब्रँड मान्यता मिळेपर्यंत क्षेपणाभूमीवर असलेल्या एम.आर.एफ. शेड मधून निघणारा इतर कचरा जसे विविध आकाराचे प्लास्टिक, रबर, कापड व इत्यादी यांची विक्री करावी लागणार असल्याचे नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, मलकापूर नगरपरिषद च्या क्षेपणभूमीवरील एम.आर.एफ. शेड मधून निघणारा कचरा जसे विविध प्रकारचे प्लास्टिक, रबर, कापड व इत्यादी यांची विक्री करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबवण्यास ही सभा त्यास मंजुरात देत आहे.

**विषय क्र ९:- आरोग्य विभागासाठी सन २०२४-२५ साठी वार्षिक निविदा करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार आरोग्य विभाग अंतर्गत सन २०२४-२५ साठी खालील कामांकरिता वार्षिक निविदा करणे बाबत कळविले आहे. त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे.

१) शहरातील डासांचा / मच्छरांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शहरात फवारणी करिता जंतुनाशक औषधी व धूर फवारणी करिता फॉगिंग लिक्विड, तणनाशक औषधी, मलेरिया ऑइल, फिनाईल ॲसिड इत्यादी खरेदी करणे.(अंदाजित खर्च - ९ ते १० लक्ष)

२) आरोग्य विभाग करिता सफाई कर्मचाऱ्यांसाठी गणवेश खरेदी करणे.(अंदाजित खर्च - ६ ते ७ लक्ष)

३) आरोग्य विभागाकरिता सफाई कर्मचाऱ्यांसाठी व सफाईचे काम करिता तसेच सार्वजनिक शौचालय सफाईचे कामा करिता साहित्य खरेदी करणे.(अंदाजित खर्च - २ ते ३ लक्ष)

४) मलकापूर शहरातील मोकाट गुरे, कुत्रे, डुकरे इत्यादी जनावरांचा बंदोबस्त करणे. (अंदाजित खर्च - ९ ते १० लक्ष)

५) नगर परिषदेच्या मालकीचे ट्रॅक्टर ट्रॉली व वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे. (अंदाजित खर्च - ६ ते ७ लक्ष)

६) शहरातील आवश्यक ठिकाणी जे.सी.बी. मशीन किंवा पोकलेन मशीन, डम्पिंग ट्रॉली ट्रॅक्टर सह व डंपर पुरविणे. (अंदाजित खर्च - ६ ते ७ लक्ष)

७) नगरपरिषदेच्या मालकीची रुग्णवाहिका चालविणे व तिची देखभाल दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे नगर परिषदेच्या निर्देशा नुसार करणे.

८) गणेश उत्सवात गणेश मूर्तीचे विसर्जनासाठी शहरातील चौका चौकात जलकुंभ उभारणे. (अंदाजित खर्च - ३ ते ४ लक्ष)

९) मलकापूर शहरातील नळगंगा नदीच्या पात्रातील जलपर्णी वनस्पती नष्ट करणे. (अंदाजित खर्च - ३ ते ४ लक्ष)

१०) मलकापूर नगर परिषदेच्या क्षेपणभूमीवरील एम.आर.एफ. शेड मधून खत व प्लास्टिक विक्री करणे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे अत्यावश्यक सेवेत येत असून महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र १०:- मलकापूर न.प. हद्दीतील वन विभागाच्या जागेवर कारवायाच्या बांधकामास परवानगी देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून सहा. नगररचनाकार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण मलकापूर यांचे पत्र क्र.साव/योजना/मल/५१६/२०२३-२४ दिनांक ०९/०१/२०२४ नुसार मलकापूर न.प. हद्दीत वनविभागाची कुप क्र. ५०० गट क्र. २८६ क्षेत्र ६.२२ हे. पैकी २ हे. मध्ये वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण, मलकापूर या कार्यालयामार्फत रोपवाटिकेचे काम करावयाचे असून सदर क्षेत्राभोवती चॅनेलिंग फेंसिंग व प्रवेशद्वार उभारणी कामाचे अंदाजपत्रके तयार करून त्यास वन अभियंता नागपूर यांची तांत्रिक मंजुरात प्राप्त झालेली असून प्रशासकीय मान्यते करिता मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे सादर केलेली आहे. तसेच वन अभियंता महाराष्ट्र नागपूर यांच्या सूचनेनुसार प्रस्तावित बांधकामे करणे पूर्वी सदर कामे नगरपालिका क्षेत्रात येत असल्यास त्या क्षेत्रातील सक्षम अधिकाऱ्यांची / यंत्रणेची मंजुरी घेऊनच बांधकामे करण्यात यावी असे सुचित केलेले आहे. सदर गट क्र. २८६ मधील क्षेत्र २ हे. हे नगरपरिषद मलकापूर क्षेत्रात येत असल्यामुळे उपरोक्त नमूद बांधकाम करण्यास नगरपरिषद मलकापूर मार्फत ना हरकत/परवानगी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मलकापूर नगरपरिषद हद्दीतील कुप क्र. ५०० गट क्र. २८६ क्षेत्र ६.२२ हे. जागा वनविभागाच्या मालकीची असल्याकारणाने सदर जागेत वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण मलकापूर यांच्यामार्फत करण्यात येणाऱ्या बांधकामास नगरपालिका मार्फत ना हरकत / परवानगी प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ११:- मलकापूर न.प. हद्दीतील टेलिफोन कॉलनी मधील सर्वे नं. १९०/१ व १९०/१ (अ) ही जागा इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) मलकापूर यांना सामाजिक उपक्रम राबविण्याकरिता देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून सहा. नगररचनाकार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, अध्यक्ष व सचिव इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांचे दिनांक २९/०१/२०२४ रोजीचे पत्रानुसार न.प. हद्दीतील टेलिफोन कॉलनी मधील सर्वे नं. १९०/१ व १९०/१ (अ) या जागेवर सन १९९८-९९ मध्ये लायन्स सेवा समिती या सामाजिक संस्थेने बॅडमिंटन हॉल व बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम केलेले आहे. सदर परिसरातील नागरिक या सभागृहाचा बॅडमिंटन खेळण्यासाठी विनामूल्य वापर करत असतात. तसेच सदर हॉल हा लायन्स क्लब

यांच्या ताब्यात होता व त्यावेळी हॉल बांधण्याकरिता व नूतनीकरणाकरता इंडियन मेडिकल असोसिएशन संस्थेतील सभासदांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत दिली होती. एका प्रकारे सदर हॉल उभारण्याकरिता (IMA) चे मोठे योगदान राहिलेले आहे. तूर्तास सदर हॉल न.प.च्या अखत्यारीत येत असून या सभागृहासाठी न.प. कडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत घेतलेली नाही. सदर हॉल (IMA) संस्थेस दिल्यास त्याचा रख रखाव व सुस्थिती राखता येईल व त्या भागातील संबंधित प्लॉट धारकांना त्याचा वापर विनामूल्य करण्यास मदत होईल.

तसेच (IMA) ही नोंदणीकृत संस्था असून शैक्षणिक, आरोग्य विषयक व इतर सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी तसेच लसीकरण, जनजागृती व पर्यावरण विषयी चर्चासत्र यासारखे शासकीय उपक्रम राबविण्यात जागेची आवश्यकता असून सदर नमूद जागा विनामूल्य (IMA) संस्थेस मिळण्याबाबत सूचित केले आहे. त्याचप्रमाणे सदरचे सभागृह हे नगरपरिषदच्या ताब्यात असून त्याचा कोणताही उपयोग होत नसल्याने वास्तू विद्रूप होत आहे व सदरचा हॉल हा (IMA) संस्थेस विनामूल्य दीर्घकाळ साठी उपलब्ध करून दिल्यास नूतनीकरण व देखभाल व्यवस्थित होऊ शकते. त्यामुळे सहानुभूतीपूर्वक सदरची जागा ही (IMA) यांना देण्याबाबत विचार करण्यासाठी नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, आज रोजी मलकापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अध्यक्षपदी प्रशासक यांची नियुक्ती झाली असल्यामुळे व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम ३१६ (ड) अन्वये न.प. मालकीच्या निहित असलेल्या सर्व स्थावर व जंगम मालमत्ता या प्रशासक काळात राज्य शासनाच्या ताब्यात असल्यामुळे न.प. मालकीच्या सर्व मालमत्ता संबंधीचे अधिकार राज्य शासनास आहेत. त्यामुळे सदर विषयी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता, मलकापूर न.प. हद्दीतील टेलिफोन कॉलनी मधील सर्वे नंबर १९०/१ व १९०/१ (अ) ही जागा सामाजिक उपक्रमाकरिता इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) मलकापूर यांना सामाजिक उपक्रम राबविण्याकरिता देण्यास जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र १२:- मलकापूर न.प. हद्दीतील नगरपरिषद शाळा क्र. १ ची शासकीय जागा व इमारत तात्पुरत्या स्वरूपात आर.सी.पी. दंगा काबू पथक ठेवण्याकरिता देण्याबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरून सहा. नगर रचनाकार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी शहरी पोलीस स्टेशन मलकापूर यांचे पत्र क्र. उपविपोअ/मल/वाचक/का व सु /दंगा काबू पथक/ तात्पुरती व्यवस्था/२०२४ - ३२१ दिनांक २५ जानेवारी २०२४ नुसार मलकापूर शहरातील सध्याची सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थिती तसेच येणारी लोकसभा निवडणूक लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने मलकापूर येथील आर.सी.पी. (दंगा काबू पथक) शहराचे मध्यवस्तीत व मिश्रवस्तीत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यामुळे सदर ठिकाणावरून दंगा काबू पथकाची वेळीच मुव्हमेंट करणे तसेच सदर भागात समाजकंटकावर वचक ठेवण्यास मदत होईल. त्याकरिता मलकापूर न.प. हद्दीतील नगरपरिषद शाळा क्र. १ ची शासकीय जागा व

इमारत मुस्लिम, हिंदू व दलित वस्ती तसेच शहराच्या मध्यभागी बाजारपेठेत असल्याने सदर शासकीय जागा व इमारत तात्पुरत्या स्वरूपात आर.सी.पी. (दंगा काबु पथक) ठेवण्याकरिता देण्याची मागणी केल्याचे नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मलकापूर यांनी Riot Control Platoon (RCP) आर.सी.पी. ला थांबवणे करिता नगरपरिषद शाळा क्र. १ ची शासकीय जागा तात्पुरत्या स्वरूपात मिळणे बाबत विनंती केली असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता सदर ठिकाणी दंगा काबू पथक स्टेशन असणे गरजेचे असल्याकारणाने तात्पुरत्या स्वरूपात सदर जागा पोलीस विभागास देण्यास हरकत नसल्याचे मा. मुख्याधिकारी यांनी अहवालाद्वारे नमूद केले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मलकापूर नगरपरिषद हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता सदर ठिकाणी दंगा काबू पथक स्टेशन असणे गरजेचे आहे व भविष्यात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या घटनांना तात्काळ नियंत्रणात आणणे करिता सदर जागा गरजेची असून आर.सी.पी. (दंगा काबू पथक) थांबवणे करिता तात्पुरत्या स्वरूपात पोलीस विभागास न.प. शाळा क्र. १ ची जागा देण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र १३:- मलकापूर न.प. अंतर्गत सन २०२४-२५ साठी भांडार विभाग अंतर्गत सर्व कार्यालयीन साहित्य खरेदी व छपाई कामासाठी वार्षिक निविदा करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून सहा. खरेदी पर्यवेक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, सन २०२४-२५ करिता भांडार विभाग अंतर्गत नगरपरिषदेचे कार्यालयीन कामकाजासाठी तसेच विविध कामांसाठी खालील प्रमाणे लागणाऱ्या कार्यालयीन साहित्याकरिता वार्षिक निविदा करणे गरजेचे आहे.

१) कार्यालयीन साहित्य छपाई करणे. (अंदाजित खर्च सहा ते सात लक्ष)

२) कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणे. (अंदाजित खर्च सहा ते सात लक्ष)

३) बॅनर प्रिंटिंग करणे फ्रेम सह, लावणे, काढणे तसेच वॉल पेंटिंग, रंग रंगोटी करणे इत्यादी. (अंदाजीत खर्च ३ ते ४ लक्ष)

४) कार्यालयीन फर्निचर खरेदी करणे. (अंदाजित खर्च तीन ते चार लक्ष)

५) फोटो व व्हिडिओ चित्रीकरण करणे. (अंदाजित खर्च एक ते दोन लक्ष)

६) नगरपरिषद मलकापूर येथे विविध कार्यक्रमासाठी कार्यालय तसेच विविध ठिकाणी लाइटिंग लावणे, टेन्ट, खुर्च्या टेबल, बिछायत ची व्यवस्था करणे. (अंदाजीत खर्च दोन ते तीन लक्ष)

ठरविण्यात येते की उपरोक्त नमूद कामे करण्याच्या कार्यवाहीस व त्यास येणारा खर्च नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र १४:- नगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागचे कंपाउंड वॉलवर तार फेन्सिंग करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, न.प. मलकापूरच्या पा.पु. विभाग हा शहराच्या मध्यभागात असल्याने शहरातील नागरिकांचा तसेच पा.पु. विभागाचे आजूबाजूला शाळा असल्याने नागरिक व शाळेतील विद्यार्थी हे पा.पु. विभागाचे आवारात येत असतात. पाणीपुरवठा विभाग संरक्षित क्षेत्र असून पा.पु. विभागाच्या आवारात कंपाउंड वॉल बांधण्यात आली आहे. परंतु कंपाउंड वॉल वर तार फेंसिंग नसल्याने व पा.पु. विभागाचे क्षेत्र मोठे असल्याने चोर रात्रीच्या वेळी उर्दू शाळा तसेच पूर्वेकडील व

दक्षिणेकडील वॉल कंपाउंड वरून पाणीपुरवठा विभागाचे आवारात येउन चोरी करून निघून जातात व दृष्टीसही येत नाही. असा चोरीचा प्रकार यापूर्वी निदर्शनास आलेला असल्याने सदर घडणाऱ्या घटनेस आळा घालण्याच्या दृष्टीने असलेल्या वॉल कंपाउंड वर तार फेंसिंग करणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरवण्यात येते की, मलकापूर न.प. चे पा.पु. विभाग व परिसर हे अत्यावश्यक सेवेची निगडित असून सदर ठिकाणी होणाऱ्या चोरीच्या घटनेला आळा घालण्याच्या दृष्टीने तिथे असलेल्या वॉल कंपाउंड वर तार फेन्सिंग लावण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधी अथवा १५ वा वित्त आयोग निधी आमदार/खासदार निधी किंवा इतर उपलब्ध निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र १५:- नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे दक्षिणेकडील दरवाजाला सुरक्षा दरवाजा बसविण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, न.प. मलकापूरच्या पाणीपुरवठा विभागास दोन मुख्य प्रवेशद्वार असून कोंडवाडा रोडकडील न.प. शाळा क्र. १ च्या प्रवेशद्वारास मोठा सुरक्षा दरवाजा बसवण्यात आलेला आहे. सदर सुरक्षा दरवाजाला कुलूप लावून बंद करण्यात आलेले आहे. परंतु चांडक शाळा ते हमीद चौक या रस्त्यावरील हॉटेल रोहिणी समोरून जलशुद्धीकरण केंद्रावर येणाऱ्या दक्षिणेकडे प्रवेशद्वारास सुरक्षा दरवाजा नसल्याने २४ तास सदर प्रवेशद्वारातून नागरिक व मुले जलशुद्धीकरण केंद्रावर येत असतात.

तसेच जलशुद्धीकरण केंद्राचे आवारात आरोग्य विभागाच्या घंटागाडी, ट्रॅक्टर व अग्निशमन गाड्या उभ्या असतात. तसेच पा.पु. विभागात संरक्षित क्षेत्र असल्याने दक्षिणेकडील प्रवेशद्वारास सुरक्षा दरवाजा असणे अत्यंत आवश्यक असून नवीन सुरक्षा दरवाजा बसवणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरवण्यात येते की, मलकापूर न.प. चे पाणीपुरवठा विभाग हे अत्यावश्यक सेवेशी निगडित असल्याकारणाने पा.पु. विभागाचे दक्षिणेकडील दरवाजाला सुरक्षा दरवाजा बसवण्यास व येणारा खर्च न.प. निधी अथवा १५ वा वित्त आयोग निधी आमदार/खासदार निधी किंवा इतर उपलब्ध निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र १६:- मलकापूर न.प. हद्दतील भारतकला रोड ते गेट नं. १३५ कृष्णविहार पाईप लाईन टाकणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मलकापूर न.प. हद्दीतील भारतकला रोड ते गट नं. १३५ कृष्णविहार या नावाने नवीन वसाहत निर्माण झाली असून या भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असल्याने व सदर भाग न.प. हद्दीमध्ये असल्याने श्री पंकज चिमणलाल मुंधडा यांनी नगरपरिषद मलकापूर कडे सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्याचे नमूद केलेले आहे.

त्यानुसार ठरविण्यात येते की, भारत कला रोड गट नं. १३५ कृष्णविहार या नावाने नवनिर्मित वस्तीमध्ये पाईपलाईन टाकणे आवश्यक असल्याकारणाने सदर भागात नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधी अथवा १५ वा वित्त आयोग / आमदार / खासदार / इतर उपलब्ध निधी अंतर्गत करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र १७:- आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता संगणक विभाग मार्फत नगर परिषद कार्यालयातील विविध विभागासाठी कॉम्पुटर व प्रिंटर इतर साहित्य खरेदी करणे बाबत वार्षिक निविदा करिता मान्यता देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून संगणक अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, न.प. मलकापूर कार्यालय, पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग तसेच इतर न.प. संबंधित कार्यालय मध्ये संगणका वर कामकाज करण्यात येते. तसेच शासनाद्वारे ई-गव्हर्नन्स धोरणानुसार IWBP प्रणाली द्वारे न.प. चे कामकाज ऑनलाईन संगणक द्वारे करण्यावर भर आहे. तसेच शासनाच्या जन्ममृत्यू, बांधकाम प्रणाली इत्यादी कामकाज संगणकावर करण्यात येते.

तरी सदर कामकाजासाठी मोठ्या प्रमाणात संगणक, प्रिंटर व इतर साहित्य लागतात तसेच सदर साहित्याची दुरुस्ती करावी लागते. त्यामुळे संपूर्ण आर्थिक वर्षाकरिता सदर साहित्य साठी वार्षिक निविदा प्रक्रिया करण्याबाबत नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरविण्यात येते की, आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता संगणक विभाग मार्फत न.प. कार्यालयातील विविध विभागासाठी संगणक, प्रिंटर इत्यादी साहित्य खरेदी व दुरुस्ती करणेबाबत वार्षिक निविदेला प्रशासकीय मान्यता घेण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या कार्यवाहीस ही सभा त्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र १८:- मलकापूर न.प. हद्दीतील पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणे मजुरी सहित व त्यास आवश्यक साहित्य पुरवठा करणे करिता वार्षिक निविदा करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून विद्युत अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सन २०१८-१९ मध्ये ESSL द्वारे मलकापूर शहरात पथदिवे लावण्यात आले होते व त्यांची देखभाल दुरुस्ती करिता सात वर्षाचा राज्य शासनाकडून करारनामा करण्यात आला होता. परंतु थकित रक्कम अदा न केल्याने ESSL कडून पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीचे काम बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यावरील पथदिवे व शहरातील इतर भागातील पथदिवे तसेच धार्मिक स्थळांचे परिसरातील पथदिवे अनेक ठिकाणी बंद किंवा खराब झालेले आहेत. रहिवाश्यांना यामुळे त्रास होत असून सदर बाबतीत तक्रारी सुद्धा प्राप्त झालेल्या आहेत. तरी शहरातील लोकांच्या तक्रारी व गरजा लक्षात घेता शहरातील विविध भागात पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करणे गरजेचे आहे. तसेच शहरात विविध शासकीय योजना अंतर्गत लावण्यात आलेले हायमास्ट लाईट टॉवर यांचा देखील देखभाल दुरुस्तीचा कार्यकाळ संपत आलेला आहे. त्यामुळे मलकापूर शहर अंतर्गत सर्व पथदिवे हाय मास्ट लाईट तसेच शहरात इतर ठिकाणी बंद पडलेले अथवा खराब झालेले स्ट्रीट लाईट यांची देखभाल व दुरुस्ती करणे तसेच त्याकरिता लागणारे साहित्य पुरवठा करणे याकरिता वार्षिक निविदा करणे बाबत नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरवण्यात येते की, मलकापूर शहरातील पथदिवे तसेच बंद पडलेले स्ट्रीट लाईट व हाय मस्ट यांची देखभाल दुरुस्ती करणे व त्यास लागणारे साहित्य पुरवठा करणे हे अत्यावश्यक सेवेची निगडित असल्याकारणाने सदर काम कामा करिता वार्षिक निविदा नगर परिषद निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र १९:- मलकापूर न.प. मालकीच्या सर्व इमारती व कार्यालयांमध्ये विद्युत यंत्रणा देखभाल दुरुस्ती करणे व त्यास लागणारे साहित्य पुरवठा करणेकरिता वार्षिक निविदा करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून विद्युत अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सन २०२४-२५ मधील न.प. मलकापूर मालकीच्या प्रशासकीय इमारत व इतर कार्यालय, इमारती यांना लागणारे विद्युत साहित्य जसे की लाईट, पंखे, बटन, स्विच, ट्यूबलाईट, एलईडी लाईट, वायर, पाण्याची मोटर, जनरेटर व इतर संबंधित साहित्य यांचा पुरवठा करणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे तसेच सदर विद्युत साहित्याची देखभाल व दुरुस्ती करण्याकरता मनुष्यबळ पुरविणे याकरिता वार्षिक निविदा करण्याबाबत नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरवण्यात येते की, मलकापूर न.प. मालकीच्या सर्व प्रशासकीय इमारती कार्यालय व इतर इमारतीमधील विद्युत यंत्रणा व उपकरणे यांची देखभाल दुरुस्ती करणे व त्यास लागणारे साहित्य पुरवणे तसेच त्याकरिता लागणारे मनुष्यबळ पुरविणे याकरिता वार्षिक निविदा प्रक्रिया न.प. निधी अंतर्गत राबवण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र २०:- नगरपरिषद मलकापूर अधिनस्त शहरातील पथदिवे चालू बंद करणे व इतर संबंधित कामे करण्याकरिता मनुष्यबळ पुरवठा करणे करिता वार्षिक निविदा करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून विद्युत अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर शहरातील पथदिवे वेळेवर चालू करणे व बंद करणे करिता शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या लाईट स्विच पेटीचा वापर करणे तसेच विद्युत वितरण कंपनीचे पोल वरील कंडक्टर मधील बिघाड (Fault) शोधून विद्युत वितरण कंपनीला सदर बिघाडा बाबत अवगत करण्यासाठी मनुष्यबळ ची गरज असून त्याकरिता वार्षिक निविदा करणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की, मलकापूर शहरातील पथदिवे वेळेवर चालू व बंद करण्याकरिता व विद्युत वितरण कंपनीचे पोल वरील कंडक्टर मधील बिघाड शोधून त्यांना अवगत करण्याकरिता मनुष्यबळ आवश्यक असल्याकारणाने वार्षिक निविदा प्रक्रिया न.प. निधी अंतर्गत राबवण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर.यु. सुरडकर**
**प्रशासक**
**नगर परिषद मलकापूर.**